SUCCESS KEY TEST SERIES

X- Semi English

(Unit Test-3 His & Poli (Semi- Ch- 6,7 & 4))

इतिहास व राज्यशास्त्र -

DATE:

TIME:१ तास ३० मी

MARKS: 40

SEAT NO:

प्र. १ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा **2**

१ ..... ही संयुक्त राष्ट्रांची संलग्न संस्था आहे.
अ. युनो ब. दू क. युनिसेफ ड. आयएलओ

२ ..... या ग्रंथात अनेक मनोरंजक खेळा व खेळण्यांचे वर्णन आहे.
अ. षठकार ब. कथासरित्सागर क. कथासागर ड. मृच्छकटिक

ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरुस्त करून पुन्हा लिहा. **2**

१ i. अडथळयांच्या शर्यती - धावण्यांची शर्यत
ii. हॉकी - बैठे खेळ
iii. जिम्नॅस्टिक्स - शारीरिक कौशल्यांवर आधारित मैदानी खेळ
iv. पोहणे - पाण्यातील खेळ

२ i. आचार्य अत्रे - राम शास्त्री
ii. टिळक आणि आगकर - विश्राम बेडेकर
iii. दिनकर डी पाटील - धन्य ते संताजी धनाजी
iv. एकच प्याला - अण्णासाहेब किर्लोस्कर

प्र.२ अ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा.(Any One) **2**

१



२



ब) टीपा लिहा(Any One) **2**

१ मराठी रंगभूमी

२ देशी / भारतीय खेळ

प्र.३ अ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.(Any Two) **6**

१ भारुडांचा वापर लोकशिक्षणासाठी केला जात असे.

२ खेळण्यांमधून आपणांस सांस्कृतिक इतिहास समजतो.

३ बाळ ज. पंडित याचे समालोचन रंजक व्हायचे.

४ संत एकनाथांनी लिहिलेली भारुडे महाराष्ट्रात लोकप्रिय आहेत.

ब) पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.(Any Two) **6**

१ खेळांच्या स्पर्धा यावर टीप लिहा.

२ भारतातील काही प्रशिक्षण केंद्रांची नावे लिहा.

३ दशावतारी नाटकांबद्दल माहिती द्या.

प्र.४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. **4**

कीर्तनाच्या नारदीय अथवा हरिदासी आणि वारकरी या दोन मुख्य परंपरा आहेत. हरिदासी कीर्तन एकपात्री प्रयोगासारखे असते. या कीर्तनात 'पूर्वरंग' व 'उत्तररंग' असतात. नमन, निरूपणाचा अभंग व निरूपण याला पूर्वरंग आणि उदाहरणादाखल एखादे आख्यान सांगणे याला उत्तररंग म्हणतात. वारकरी कीर्तनात सामूहिकतेवर भर असतो. कीर्तनकारांबरोबर टाळकऱ्यांचा सहभाग महत्त्वाचा असतो. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात राष्ट्रीय कीर्तन नावाचा नवा प्रकार पुढे आला. हे कीर्तन नारदीय कीर्तनाप्रमाणेच सादर केले जाते. त्यामध्ये स्वातंत्र्य चळवळीतील नेते, शास्त्रज्ञ, समाजसुधारक अशा थोर लोकांच्या चरित्राच्या आधारे समाजप्रबोधन करण्यावर भर असतो. त्याची सुरुवात वाईचे दत्तोपंत पटवर्धन यांनी केली. याशिवाय महात्मा जोतीराव फुले प्रणित सत्यशोधक समाजानेही कीर्तनाच्या माध्यमातून समाजजागृतीचे कार्य केले. संत गाडगे महाराजांची कीर्तने सत्यशोधकी कीर्तनाशी नाते सांगणारी होती. जातिभेद निर्मूलन, स्वच्छता, व्यसनमुक्ती यांसारख्या विषयांवर ते त्यांच्या कीर्तनातून प्रबोधन करत असत.

i. कीर्तनाच्या दोन मुख्य परंपरा सांगा.
ii. राष्ट्रीय कीर्तनाची परंपरा कोणी सुरु केली.
iii. कीर्तनाच्या माध्यमातून समाज जागृतीचे कार्य केले जाते याचे समर्थन करा.

प्र.५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.(Any One) **4**

१ कठपुतळ्यांची कला याबाबत लिहा.

२ खेळ आणि इतिहास यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

प्र.६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय लिहा.(PS) **2**

१ शेतकरी चळवळीची ..... ही प्रमुख मागणी आहे.
अ. वनजमिनीवर लागवड करण्याचा अधिकार मिळावा
ब. शेतमालाला योग्य भाव मिळावा
क. ग्राहकांचे संरक्षण करणे
ड. धरणे बांधावीत

२ ..... विरोधीच्या चळवळीला बरेच यश आले असून बालविवाहाच्या प्रमाणात सुमारे ५०% घट झाली आहे.
अ. सती ब. बालविवाह क. केशवपन ड. हुंडा

प्र. ७ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.(PS)(Any Two) **4**

१ निषेध अथवा प्रतिकार करण्याचा हक्क हा लोकशाहीचा एक महत्त्वाचा हक्क आहे.

२ स्त्रियांनी आपल्यावर होणाऱ्या अन्याया विरुद्ध चळवळी सुरु केल्या.

३ चळवळीला नेतृत्व नसते.

प्र.८ पुढील संकल्पना स्पष्ट करा.(PS) **2**

चळवळ

प्र.९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.(PS)(Any Two) **4**

१ चळवळ म्हणजे काय ?

२ टीपा लिहा:- स्त्री चळवळ म्हणजे काय स्पष्ट करा ?

३ शेतकरी चळवळीच्या मागण्या काय आहेत ?